जाहिरात तारीखः ०५/०८/२०२६.

अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीखः २१/०८/२०२६.

# सफाईगार पदाकरीता जाहिरात

# जिल्हा न्यायालय, गडचिरोली

जिल्हा न्यायालय, गडचिरोली या आस्थापनेवरील सफाईगाराचे **०१** पदासाठी उमेदवारांची निवड यादी तयार करणेकरीता जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेस पात्रता निकष पुर्ण करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून खालीलप्रमाणे ऑफलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात नोंदणीकृत डाक पोच पत्राद्वारे (आर. पी.ए.डी.) किंवा शिघ्र डाक सेवा (स्पिड पोस्ट) द्वारे **सफाईगार या पदाकरीता अर्ज**, असे लिफाफ्यावर लिहून प्रबंधक, जिल्हा न्यायालय, गडचिरोली (यानंतर ज्यास संक्षेपाकरीता जिल्हा न्यायालय असे संदर्भीत केलेले आहे) यांच्याकडे **दिनांक २१/०८/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** अथवा **त्यापुर्वी** पोहचतील अशा बेताने आपले अर्ज पाठवावेत.

या तारखेनंतर आलेले अर्ज अथवा ईतर मार्गाने पाठविलेले किंवा लिफाफ्यावर **सफाईगार पदाकरीता अर्ज** असे नमूद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. डाक विभागाद्वारे झालेला विलंब विचारात घेतला जाणार नाही.

**सफाईगार**

**निवड यादीसाठी सफाईगार पदाची संख्याः ०१**

सफाईगार पदाच्या पात्रतेकरीता उमेदवार:

**पात्रता/अर्हता:** अ) उमेदवार किमान ७ वी (सातवी) इयत्ता उत्तीर्ण असावा.

ब) शरीर प्रकृतीने सुदृढ व पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी सक्षम असावा.

क) उमेदवारास कोणत्याही गुन्ह्यात अटक झालेली नसावी किंवा दोषी ठरविण्यात आलेले नसावे. उमेदवाराने त्याचे/तिचे विरुद्ध फौजदारी खटला/तक्रार किंवा निर्णय झालेला खटला प्रलंबीत असल्याबाबत उघड केले पाहीजे.

ड) दिनांक २८/०३/२००६ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकुण ०२ पेक्षा जास्त नसावी.

इ) उमेदवाराने स्वच्छता काम करण्यास सक्षम असल्याबाबत नोंदणीकृत वैद्यकीय तज्ञ यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**अनुभवः** उमेदवारास शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच शासकिय कार्यालय अथवा न्यायालयात पूर्वी काम केल्याचा अनुभव असल्यास त्या उमेदवारास प्राधान्य दिल्या जाईल.

**वयोमर्यादा:** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दिनांक २५/१०/२०१६ अन्वये खुला/ सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी किमान १८ वर्षे आणि कमाल ४३ वर्षे राहील.

**वेतनस्तर:** एस—१, १५०००—४७६००

## उमेदवारांना सुचना

१) अर्ज ए४ आकाराच्या (A4 Size) एका पांढऱ्या रंगाच्या कागदावर संगणकीत/ टंकलिखीत/ हस्ताक्षरीत केलेला असावा. या जाहिरातीत दिलेल्या नमुन्याप्रमाणे आणि त्यात दिलेल्या मांडणीप्रमाणे अर्ज करण्यात यावा.

२) उमेदवाराने शैक्षणीक अर्हतेबाबत कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती, प्रमाणपत्रे अर्जासोबत सादर करावे.

३) उमेदवाराने त्याचे/तीचे अलीकडचे पासपोर्ट साईजचे २ एकसारखी रंगीत छायाचित्रे, त्यापैकी १ छायाचित्र अर्जावर दिलेल्या जागी लावून त्यावर अशाप्रकारे स्वाक्षरी करावी की, त्यातील काही भाग छायाचित्रावर आणि उर्वरीत भाग अर्जावर येईल. तसेच दुसरे छायाचित्र अर्जासोबत संलग्नीत करावे.

४) उमेदवाराने मौखिक मुलाखतीस उपस्थित होते वेळी मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे जसे:— शाळा सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र, जातीचा दाखला, गुणपत्रिका, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, अनुभव प्रमाणपत्र व उल्लेखीत/ईतर आवश्यक दस्तावेज व त्यांच्या ०२ छायांकीत प्रती, दोन सन्माननिय व्यक्तींनी (नातेवाईक नसलेले) दिलेले चारित्र्याचे दाखले सादर करावेत. तसेच त्याचेविरुद्ध कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला चालू नसल्याचे प्रमाणित करावे. तसे न्यायालयीन प्रकरण असल्यास त्याचा तपशिल द्यावा.

५) जे उमेदवार या पुर्वीच शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्या—त्या विभाग/ कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेऊनच अर्ज करावा. अशी परवानगी मुलाखतीचे वेळी सादर करावी. उमेदवारांनी आपले अर्ज त्यांच्या विभाग व कार्यालय प्रमुखामार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.

६) उमेदवाराने जर निवड प्रक्रीयेच्या संदर्भात स्वत: किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायीक विभागाच्या अधिकाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्यांचेवर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

७) उमेदवारास मुलाखतीसाठी उपस्थित होतांना कार्यालयाकडून पुरविण्यात येणारे 'लहान कुटूंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र' विहीत नमुन्यामध्ये भरुन देणे बंधनकारक राहील.

८) उमेदवाराने स्वत:चा अचूक पत्ता लिहीलेले एक पोस्टकार्ड, **रु.५ चे पोस्टाचे तिकीट व स्वत:चा अचूक पत्ता लिहीलेला पिन कोड क्रमांकासह लिफाफा** अर्जासोबत जोडावा.

९) विहीत नमुन्यात नसलेला, स्वाक्षरी नसलेला, फोटो न जोडलेला, एकसारखे फोटो जोडलेले नसलेला, तसेच अपूर्ण माहिती भरलेला अर्ज विनासुचना रद्द करण्यात येईल.

१०) निवड समिती समान निकष लावून अर्हता/योग्यतेच्या आधारे उमेदवारांची सफाईगार पदासाठी अल्पसुची तयार करण्याचे अधिकार निवड समिती, जिल्हा न्यायालय, गडचिरोली यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

११) उमेदवारांच्या अर्जाच्या संख्येनुसार चाळणी परीक्षा (स्वच्छतेसंबंधी किंवा सामान्य ज्ञानासंबंधीचे प्रश्नावर आधारीत) घेण्याबाबतचे अधिकार निवड समिती, जिल्हा न्यायालय, गडचिरोली यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

१२) चाळणी परिक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास उमेदवारांची २० गुणांची चाळणी परीक्षा घेण्यात येईल.

१३) चाळणी परिक्षेतील किमान पात्रता निकष ठरविण्याचा अधिकार निवड समितीकडे राहील.

१४) सफाईगार या पदासाठी पात्र उमेदवारांची १० गुणांची चापल्य व साफसफाई कामाची मुल्यमापन परिक्षा घेण्यात येईल.

१५) सफाईगार या पदासाठी चापल्य व साफसफाई कामाचे मुल्यमापन परिक्षेत उत्तिर्ण झालेल्या उमेदवारांची ४० गुणांची मौखिक मुलाखत घेण्यात येईल.

१६) उमेदवारांना परिक्षा व मुलाखतीस बोलविल्यास स्वत:च्या खर्चाने हजर रहावे लागेल.

१७) सर्व परिक्षांसाठीचे वेळापत्रक व निकाल जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली च्या अधिकृत संकेतस्थळावर व सुचना फलकावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. परंतु तो बदल/माहिती/निकाल वैयक्तिकरित्या उमेदवाराला कळविण्यात येणार नाही. त्यामुळे अर्ज भरल्यानंतर उमेदवारांनी नियमित अधिकृत संकेतस्थळाला भेट देत राहावे.

१८) अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

१९) या निवड प्रक्रियेचे अनुषंगाने काही बदल/दुरुस्ती करण्याचे तसेच कोणत्याही सुचनेविना सदर भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार जिल्हा न्यायालयाचे निवड समितीकडे राहतील.

२०) उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की, त्यांनी दिलेली माहिती खरी आहे असा विश्वास ठेवून त्यांच्या पात्रतेचे मूल्यमापन केले जाईल. जर कोणत्याही उमेदवाराने खोटी, सदोष किंवा चुकीची माहिती दिल्याचे आढळल्यास अशा उमेदवाराला अपात्र तर ठरवले जाईलच, शिवाय त्यास अभियोगास तोंड द्यावे लागेल. अशा उमेदवारांना उच्च न्यायालय किंवा जिल्हा न्यायालयांतर्गत कोणत्याही परीक्षेत, कोणत्याही पदांकरीता अर्ज करण्यासाठी मनाई केली जाईल.

**<u>अर्ज भरण्यासंबंधी महत्वाच्या सुचना</u>**

१) शैक्षणिक अर्हतेच्या रकान्यामध्ये उमेदवारांनी त्याची/तिची उच्चतम शैक्षणिक अर्हता नमूद करावी.

२) इतर प्रवर्ग रकान्यामध्ये शारिरीकदृष्ट्या अपंग, प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, आर्थिकदृष्ट्या मागास, वरिलपैकी कोणतेही नाही यापैकी उमेदवाराने त्यांचा प्रवर्ग नमूद करावा. एकापेक्षा जास्त प्रवर्ग असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे.

**<u>टिप</u>**: १) निवड यादी प्रसिद्ध झाल्यापासून फक्त २ वर्षाचे कालावधीपर्यंत वैध राहील.

२) एका लिफाफ्यात फक्त एकाच उमेदवाराचा अर्ज असावा. एकाहून जास्त अर्ज एका लिफाफ्यात असल्यास तसे सर्व अर्ज अग्राह्य ठरतील.

३) लिफाफ्यावर **<u>सफाईगार पदाकरीता अर्ज</u>** असे नमूद करणे गरजेचे आहे.

४) ओळखपत्र असल्याशिवाय परिक्षेला तसेच मौखिक मुलाखतीला हजर राहण्यास परवानगी मिळणार नाही.

दिनांक– ०४ /०८/२०२६.

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, गडचिरोली.

| |
|---|
| नुकतेच काढलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षरीसहीत |

# सफाईगार या पदाकरीता अर्ज

(टिप: अर्ज भरण्यापुर्वी जाहीरातींमध्ये दिलेल्या सुचना काळजीपुर्वक वाचा)

१) अर्जदाराचे नाव : ——————— ——————————— ———————
(प्रथम नाव) (पित्याचे / पतीचे नाव) (आडनाव)

२) पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोड क्रमांकासह: ——————————————
——————————————
——————— पिनकोड ———————

३) मूळ पत्ता पिनकोड क्रमांक सहीत: ——————————————
——————————————
——————— पिनकोड ———————

४) जन्म दिनांक (अंकात): दिनांक__________महिना__________वर्ष__________
(अक्षरात) ——————————————————————————

५) जाहीरात प्रसिद्धीचे दिवशी वय: वर्ष__________महिना__________दिवस__________

६) उमेदवाराचा धर्म ——————— जात ——————— प्रवर्ग ———————

७) लिंग — ——————————————————

८) उच्चतम शैक्षणिक पात्रता— ——————————————————
प्राप्त गुण व टक्केवारी ——————————————————

९) इतर प्रवर्ग ——————————————————

१०) जाहिरातीचे दिनांकास हयात मुलांची संख्या ______________________________

११) न्यायीक विभागात कार्यरत असलेल्या नातेवाईकांसंबंधी माहिती

| नाव | पदनाम व कार्यरत आस्थापना | उमेदवाराशी नाते |
|---|---|---|
| | | |

१२) सफाईगार कामाचा अनुभव आहे / नाही— ————————

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो / करते की, मला शासकीय सेवेकरीता अपात्र घोषीत केलेले नाही, मला फौजदारी गुन्ह्यात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्या विरुद्ध कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबीत आहे / नाही.(असल्यास तपशील जोडलेला आहे.)

मी याद्वारे शपथपुर्वक कथन करतो / करते की, अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे, त्यातील कोणतीही गोष्ट खोटी / चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रीयेपासून अपात्र घोषीत केले जाईल आणि जर निवड / नेमणूक झाल्यास माझी सेवा कोणतीही नोटीस / सुचना दिल्याविना समाप्त केली जाईल.

————————————

दिनांक— / ०८ / २०२६ अर्जदाराची सही